सकाळ
सोलापूर, शुक्रवार, २४ जुलै २०१५

# माळढोक कागदावरील सर्वांत मोठे अभयारण्य

## डॉ. प्रमोद पाटील यांची खंत; किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाचे उद्‌घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

सोलापूर, ता. २३ : माळढोक पक्ष्यासाठी सोलापूर परिसरातील जिल्ह्यांचा काही भाग अभयारण्य म्हणून जाहीर करण्यात आला असला, तरी प्रत्यक्षात अनेक टोलेजंग इमारती, रेल्वेस्थानक, विमानतळ या अभयारण्याच्या क्षेत्रात उभे करण्यात आले आहे. त्यामुळे माळढोक अभयारण्य हे भारतातील कागदावरचे सर्वांत मोठे अभयारण्य आहे, अशी खंत पक्षीतज्ज्ञ आणि माळढोकचे अभ्यासक डॉ. प्रमोद पाटील यांनी व्यक्त केली.

किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाचे उद्‌घाटन गुरुवारी दुपारी सोलापूर विद्यापीठाच्या सभागृहात झाले. त्या वेळी ते बोलत होते. प्रारंभी सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. एन. मालदार, एन. टी. पी. सी.च्या महाव्यवस्थापिका डॉ. सुनीता सिंह, डॉ. पाटील, किर्लोस्कर कंपनीचे एच. आर. मॅनेजर डॉ. एस. पी. वैद्य यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून महोत्सवाचे उद्‌घाटन करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर महोत्सवाचे संचालक वीरेंद्र चित्राव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. बी. एन. कांबळे, कुलसचिव डॉ. एस. के. माळी उपस्थित होते. उद्‌घाटनानंतर डॉ. पाटील यांचे आपला माळढोक या विषयावर व्याख्यान झाले.

डॉ. पाटील म्हणाले, की वन्यजीव, पक्ष्यांचा कितीही त्रास झाला तरी प्राणिमात्रांबद्दलचे समाजातील प्रेम कमी न होणे ही भारतीय संस्कृतीतच आहे. त्यामुळे भारतीयांच्या स्वभावात हा संस्कार उतरला आहे. परंतु, माळढोकच्या संवर्धनाची योग्य काळजी न घेतल्यामुळे भारतात केवळ २५० पक्षी उरले आहेत. हा पक्षी संकटग्रस्त प्रकारात असल्याचा निष्कर्षही जागतिक पातळीवर नोंदविण्यात आला आहे. या पक्ष्यासाठी देशभरात १० अभयारण्ये आहेत. परंतु, या पक्ष्याचे जतन, संवर्धन योग्य प्रकारे झालेले नाही. माळढोक पक्षी वाचला तर तेथील माळरान वाचेल. या पक्ष्यामुळे वन्यजीवांच्या अनेक प्रजाती जिवंत राहू शकणार आहेत. नागरिकांच्या मनातील माळढोकच्याबाबत असलेला रोष कमी होण्याची गरज आहे, असेही डॉ. पाटील या वेळी म्हणाले.

कुलगुरू डॉ. मालदार म्हणाले, की वसुंधरा महोत्सवाने पर्यावरण रक्षणाचे कार्य करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी चांगली संधी उपलब्ध करून दिली आहे. पर्यावरणाच्या रक्षणाचे प्रयत्न आपण स्वत:पासून सुरू केले पाहिजेत. परदेशात गेल्यानंतर आपण तेथील स्वच्छतेचे नियम पाळतो, परंतु आपल्या देशात हे नियम पाळत नाहीत, हे दुर्दैव आहे. दर बुधवारी दुपारी चार ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत विद्यापीठाच्या आवारात स्वच्छता करण्यात येत असल्याचेही कुलगुरू डॉ. मालदार यांनी सांगितले. या वेळी प्रा. बी. एन. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रवींद्र चिंचोळकर यांनी आभार मानले. या वेळी बीसीयूडी संचालक डॉ. आर. वाय. पाटील, संयोजक प्रा. नरेंद्र काटीकर, वृक्षमित्र बाबूराव पेठकर आदी उपस्थित होते.



सोलापूर : किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाचे गुरुवारी रोपाला पाणी घालून उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. एन. एन. मालदार. या वेळी डॉ. प्रमोद पाटील, डॉ. सुनीता सिंह, डॉ. एस. पी. वैद्य, डॉ. एस. के. माळी, वीरेंद्र चित्राव, प्रा. बी. एन. कांबळे.